CMYK

बीड । सोमवार

०२.०६.२०२५

वर्षे : ५ अंक : ६२

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 




# राजकारणातील सर्वात मोठा भूकंप

## अजित पवारांना मोठा धक्का, 7 विद्यमान आमदारांनी सोडली साथ

**मुंबई । प्रतिनिधी**

राजकारणात मोठा भूकंप आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (एनसीपी) सात विद्यमान आमदारांनी शनिवारी सत्ताधारी नॅशनलिस्ट डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पक्षात विलयाचा निर्णय घेतला.

यामुळे अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील एनसीपी गटाला मोठा धक्का बसला आहे. या विलयामुळे मुख्यमंत्री नेफ्यू रियो यांच्या नेतृत्वाखालील छउ्झझ ला ६० सदस्यीय विधानसभेत पूर्ण बहुमत प्राप्त झाले आहे. छउ्झझ च्या आमदारांची संख्या आता २५ वरून ३२ वर गेली आहे.

२०२३ च्या विधानसभा निवडणुकीत एनसीपीने नागालँडमध्ये १२ जागा जिंकत तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून उदयास आले होते. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील एनसीपीमध्ये फूट पडल्यानंतर नागालँडमधील पक्षाच्या युनिटने अजित पवार यांच्या गटाला पाठिंबा दिला होता. मात्र, आता सात आमदारांनी छउ्झझ मध्ये विलय करून अजित पवार यांच्या गटाला मोठा धक्का दिला आहे. या घडामोडींमुळे नागालँडमधील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत. नागालँड विधानसभा अध्यक्ष शारिंगेन लाँगकुमेर यांनी सातही आमदारांनी सादर केलेल्या विलय पत्राला मान्यता दिली आहे. या आमदारांनी स्वतः उपस्थित राहून विधानसभा अध्यक्षांना औपचारिक पत्र सादर केले. विधानसभा अध्यक्षांनी जारी केलेल्या आदेशानुसार, हा वितय संविधानाच्या दहाव्या अनुसूचीच्या तरतुदींनुसार आहे आणि नागालँड विधानसभा (दल-बदल अयोग्यता) नियम, २०१९ च्या अनुषंगाने मंजूर करण्यात आला आहे. यासोबतच विधानसभा सचिवालयाला पक्ष संलग्नतेचे रेकॉर्ड अद्ययावत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

राज्य सरकारमधील मंत्री के. जी. केन्ये यांनी पत्रकार परिषदेत सांगितले, आज सायंकाळी सात एनसीपी आमदारांनी विधानसभा अध्यक्षांना विलय पत्र सादर केले, ▶▶ उर्वरित पान २ वर

# ईदच्या आधी महाराष्ट्र सरकारचा मोठा निर्णय, पशु बाजार बंद ठेवण्याचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**





महाराष्ट्रात ७ जून रोजी साजरी होणाऱ्या बकरी ईदच्या आधी राज्य गौसेवा आयोगाने एक मोठा निर्णय घेतला आहे. आयोगाने सर्व कृषी उत्पन्न मंडळ समित्यांना ३ जून ते ८ जून या कालावधीत पशु बाजार बंद ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. हे पाऊल प्रामुख्याने गुरांची बेकायदेशीर कत्तल रोखण्यासाठी आहे. महाराष्ट्रात गायी आणि बैलांच्या कत्तलीवर पूर्णपणे बंदी आहे आणि त्यांचे मांस ठेवणे देखील गुन्हा मानला जातो.

या आदेशानुसार, मेंढ्या, शेळ्या आणि म्हशींसारख्या इतर प्राण्यांसह या प्राण्यांच्या बाजारपेठेत एका आठवड्यासाठी व्यापारावर बंदी घालण्यात ▶▶ उर्वरित पान २ वर



*मराठा समाजाचे हृदय स्थान मराठा संघर्ष योध्दा मा मनोज दादा जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटी येथे माझा दादा कडून वाढदिवसाच्या सत्कार व शुभेच्छा दिल्या आज दादांनी दोन-तीन तास वेळ दिला भरपूर चर्चा झाली यावेळेस अखिल भारतीय मराठा महासंघाचे मराठवाडा सरचिटणीस विनोद आप्पा इंगोले बीड जिल्हा उपाध्यक्ष परमेश्वर बाप्पा कवचट बीड जिल्हा उपाध्यक्ष सुमंत खांडे सर बीड जिल्हा उपाध्यक्ष शाम जी गायकवाड गेवराई तालुका उपाध्यक्ष विठ्ठल संत बीड शहर अध्यक्ष दत्ता शेळके पाटील घोडके अण्णा*

# महिलाच नव्हे पुरुषांनाही मिळणार एसटीच्या प्रवासात विशेष सवलत; परिवहन मंत्र्यांची मोठी घोषणा



**सोलापूर । प्रतिनिधी**

प्रवाशांना दर्जेदार सुविधा देण्याबरोबरच कर्मचाऱ्यांना देखील आर्थिक दृष्ट्या सक्षम करणाऱ्या एसटीला देशातील क्रमांक एकची परिवहन संस्था निर्माण करणे हेच ध्येय असेल, असे प्रतिपादन परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले. एसटीच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त यशवंत नाट्य मंदिर येथे आयोजित केलेल्या नाविन्यपूर्ण योजनांचा शुभारंभ आणि गौरव पुरस्कार सोहळ्यानिमित्त बोलत होते. या वेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय डॉ. माधव कुसेकर एसटीचे सर्व वरीष्ठ अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. यावेळी ▶▶ उर्वरित पान २ वर

# परळीत संतापजनक घटना, वैद्यनाथ मंदिराच्या परिसरात मांसाहारी अन्न शिजवलं

**परळी । प्रतिनिधी**

परळीमध्ये संतापजनक प्रकार समोर आला आहे. वैद्यनाथ मंदिराच्या परिसरातच मांसाहारी अन्न शिजवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. बांधकामासाठी मुक्कामी असलेल्या कामगारांनी मांसाहारी अन्न शिजवल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. या घटनेनंतर भाविकांमधून संताप व्यक्त केला जातोय. परळी येथील प्रभू वैद्यनाथ मंदिर परिसरात विकास कामे सुरू आहेत. या ठिकाणी बांधकामावर असलेल्या कामगारांनी याच परिसरात मांसाहारी जेवण बनवले असल्याचे समोर आले.. या परिसरातील काही भाविकांना हा प्रकार लक्षात आल्यानंतर त्यांनी त्या ▶▶ उर्वरित पान २ वर




# मराठा आंदोलनाला मोठे यश; वर्षाराणी दळवे ठरल्या पहिल्या मराठा कुणबी सरपंच

**धाराशिव । प्रतिनिधी**

गेल्या दहा वर्षांत मराठा आरक्षणासाठी राज्याने अनेक आंदोलनं पाहिली. पण अद्यापही मराठा आरक्षणाचा तिढा सुटलेला नाही. पण राज्य सरकारच्या काही तरतुदीची फळं आता या समाजाला मिळत असल्याचे दिसून येत आहे. मराठा आंदोलनाला मोठे यश आल्याचे दिसून आले आहे. धाराशिव जिल्ह्यातील कुंभारी इथं वर्षाराणी दळवे या राज्यातील पहिल्या मराठा कुणबी सरपंच ठरल्या आहेत.



तुळजापूर तालुक्यातील कुंभारी हे गाव आहे. मनोज जरंगे पाटलांच्या आंदोलनानंतर वर्षाराणी सत्यवान दळवे यांना कुणबी प्रमाणपत्र मिळाल्याचे त्यांचे म्हणणे आहे. दरम्यान हे मराठा आंदोलनाला आलेले यश असल्याची प्रतिक्रिया समाजातून उमटत आहे.

वर्षाराणी दळवे मराठा कुणबी सरपंच-मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर शिंदे समितीकडून कुणबी नोंदी शोधण्याचे काम हाती ▶▶ उर्वरित पान २ वर

# रिंकू सिंहची विकेट पडली, थेट खासदार पटवली; लग्नाची तारीखही झाली निश्चित



**मुंबई । प्रतिनिधी**

टीम इंडियाचा स्टार क्रिकेटपटू रिंकू सिंह याची विकेट पडली आहे. रिंकू सिंह याने थेट खासदार पटवली असून दोघांच्या लग्नाची तारीखही निश्चित झाली आहे. ८ जून रोजी दोघांचा साखरपुडा होईल आणि याच वर्षी १८ नोव्हेंबर रोजी लग्नाचा बार उडेल. या लग्नात दोघांचे कुटुंबीय, मित्र परिवार आणि निवडक लोक उपस्थित ▶▶ उर्वरित पान २ वर

# बडतर्फ पोलीस अधिकारी रणजीत कासलेला दिल्लीतून अटक; मुंबई गुन्हे शाखेच्या पथकाची कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

बीडचे निलंबित पोलीस अधिकारी रणजीत कासले (ठरपक्षळीं घरीश्रश) संदर्भात एक मोठी माहिती समोर आली आहे. बडतर्फ पोलीस अधिकारी रणजीत कासलेला दिल्लीतून अटक केल्याची माहिती समोर आली आहे. बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाणे आणि सायबर विभागात कासले विरोधात कालच दोन गुन्हे दाखल करण्यात आले होते. तसेच मुंबईत देखील कासले विरोधात गुन्हा दाखल आहे. दरम्यान दोन समाजात तेढ निर्माण करणे आणि राजकीय नेत्यांवर केलेल्या आरोप प्रकरणात कासलेला अटक झाल्याची माहिती समोर आली आहे. मुंबई गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला दिल्लीतून अटक केली आहे. रणजीत कासलेला



न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्याला दोन दिवसांसाठी मुंबई गुन्हे शाखेच्या कोठडीत पाठवले असल्याची माहिती ही समोर आली आहे.

रणजित कासले विरोधात बीडमध्ये दोन गुन्हे दाखल

वादग्रस्त बडतर्फ पोलिस अधिकारी रणजित कासले याच्यावर बीडच्या सायबर पोलीस ठाण्यात दोन वेगवेगळ्या तक्रारींवरुन दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. बीड येथील सामाजिक कार्यकर्ते मोहन अघाव यांच्या तक्रारीवरुन सामाजिक शांतता भंग केल्या प्रकरणी, तसेच दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे हे प्रकरण आहे. तर दुसरा गुन्हा मंत्री संजय शिरसाट यांच्याबद्दल बदनामीकारक भाष्य सोशल मिडीयातून केल्याच्या प्रकरणात गुन्हा दाखल आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी ही तक्रार दिली आहे. या दोन्ही तक्रारींवरुन बीडच्या सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस करत आहेत.

जामीन मिळाल्यानंतरही आरोप सत्र सुरूच- दरम्यान, रणजित कासलेच्या विरोधात यापूर्वी ▶▶ उर्वरित पान २ वर

CMYK

# 'एसटी'चा प्रवास सुखकर व्हावा

एसटी अर्थात समस्त राज्याची लाडकी 'लालपरी'चा वाढदिवस नुकताच संपन्न झाला. ३६ गाड्यांसह सुरु झालेल्या एसटीचा प्रवास आज राज्यभरात अविरतपणे सुरु आहे. आजमितीला १८ हजाराहून अधिक गाड्या महामंडळात सेवा देत आहेत. शहरी भाग सोडला तर एसटी हा ग्रामीण भागातील नागरिकांचा नेहमीच जिवाभावाचा विषय ठरला आहे. तालुक्यात शिक्षणासाठी प्रतिदिन जाणारी शाळा महाविद्यालयीन विद्यार्थी मंडळी असो वा आठवडी बाजारात खरेदीसाठी जाणारी ग्रामस्थ मंडळी असो, माहेरी पाहुणचार घेण्यासाठी आलेली नवविवाहिता असो वा नोकरी व्यवसायानिमित्त दैनंदिन प्रवास करणारी मंडळी असो सर्वांनाच इच्छित स्थळी नेण्याचे आणि आणण्याचे काम आजवर राज्य परिवहन महामंडळाच्या लालपरीने केले आहे. एसटीचे चालक-वाहक आणि एसटीने नियमित प्रवास करणारी मंडळी यांच्यामध्ये एक अतूट नाते निमर्ण झाले आहे. नेहमीची व्यक्ती स्थानकावर दिसली नाही कि एसटीच्या वाहकालाही चुकल्याचुकल्या सारखे वाटते. एसटीच्या चालकांनाही नेहमीच्या रस्त्यातील खड्डे, गतिरोधक, वळणे अगदी तोंडपाठ झालेली असतात त्यामुळे एखाद्या ठिकाणी अधिक प्रवासी चढले उतरले तरी नेहमीच्या थांब्यांवर एसटीची यायची वेळ सहसा चुकत नाही. आज जी कोकण रेल्वे भरभरून वाहते आहे हा सारा भार पूर्वी एसटी आपल्या अंगा खांद्यावर वाहत होती. आजमितीला ज्या गावात अन्य वाहने पोहोचली नाहीत अशा गावांतही एसटीचे जाळे पसरले आहे. आजही सुट्टीत शहरातून गावाला जायचे म्हटले तर रेल्वे स्थानकावर उतरल्यावर पुढचा प्रवास अनेकांना एसटीनेच करावा लागतो. वाढत्या महागाईसोबत लोकांची मिळकतही वाढली, मिळकत वाढल्याने राहणीमानही बदलत गेले, त्या अनुषंगाने परिवहन महामंडळातही अधिक सोयी आणि सुविधा पुरवणारे बदल झाले. शहर वाहतुकीत वातानुकूलित गाड्या आल्या तशा राज्य परिवहन महामंडळातही गारेगार प्रवासाचा अनुभव देणाऱ्या वातानुकूलित गाड्यांचा प्रवेश झाला. या गाड्यांना राज्यातील नागरिकांनीही भरभरून प्रतिसाद दिला आणि आजही देत आहेत. आता तर इलेक्टिक बसेसही महामंडळात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रदूषण नियंत्रणातही एसटी



हातभार लावत आहे. राज्य सरकारने महिला प्रवाशांसाठी तिकीट दरात ५० टक्के सूट दिल्यामुळे महिला प्रवाशांची संख्या कमालीची वाढली आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून आता महिला वाहकही एसटी गाड्यांतून जागोजागी दिसू लागल्या आहेत. रस्त्यांचे जाळे गावागावांत पसरले असले तरी सर्वच रस्ते गुळगुळीत आहेत असे नाही. अनेक ठिकाणी मातीच्या कच्च्या रस्त्यांतून एसटीला प्रवास करावा लागतो. आजमितीला राज्यातील अनेक भागांत रस्ता रुंदीकरणाची आणि दुरुस्तीची कामे सुरु आहेत अशा वेळी खडकाळ रस्त्यातून मार्ग काढत लालपरी नागरिकांना इच्छित स्थळी पोहोचवण्याचे कार्य अविरतपणे करत आहे.

आजमितीला अनेक भागांत मोठ्या प्रमाणात प्रवासी उपलब्ध असताना त्या भागांत एसटीच्या दिवसातून केवळ २ ते ३ फेऱ्या होतात. मधल्या काळात स्थानिक वडापवाले कोंबून प्रवाशी भरून बक्कळ पैसे कमावत असतात. राज्यातील जवळपास सर्वच एसटी डेपोच्या बाहेर वेगवेगळ्या मार्गाने प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या काळी पिवळी गाड्यांचा समूह प्रवाशांना हातवारे करत बोलावताना दिसून येतो. या ठिकाणी एसटी बसेस जाऊ शकत नाहीत का ? दरवर्षी एसटी महामंडळ तोट्यात असल्याचे दाखवण्यात येत असले, तरी एसटीला नफ्यात आणण्याचे उपायसुद्धा एसटीकडेच आहेत. आजमितीला एसटी महामंडळाकडे असलेला बसगाड्यांचा ताफा राज्याच्या वाढत चाललेल्या लोकसंख्येच्या तुलनेत खूपच अल्प आहे. काही मार्गांवर धावणाऱ्या एसटी बसेसची संख्या कमी असल्याने जेव्हा केव्हा या गाड्या थांब्यावर येतात तेव्हा प्रवासी त्यावर तुटून पडतात. एकमेकांना मागे टाकत बसमध्ये बसण्यासाठी जागा मिळवण्याच्या संघर्षात महिला, लहान मुले, वयोवृद्ध यांचे अतोनात हाल होतात. सणासुदीच्या काळात महामंडळाकडून जादा गाड्या सोडूनही त्यासुद्धा कमी पडतात, ज्याचा लाभ खासगी ट्रॅव्हल्स आणि ट्रान्सपोर्ट कंपन्या घेतात, इच्छित स्थळी जाण्यासाठी प्रवाशांकडून अव्वाच्या सव्वा भाडी आकारतात. एसटी उपलब्ध न झाल्याने प्रवाशांना नाईलाजाने या लुटीचा सामना करावा लागतो. कालानुरूप अद्यावत होत असणारे एसटी महामंडळ वाढत्या लोकसंख्येनुरुप गाड्यांची संख्या का वाढवत नाही ? गाड्या वाढल्या कि प्रवाशांची सोय तर होणारच आहे शिवाय अनेकांना रोजगारही उपलब्ध होणार आहेत. आजही अनेक एसटी बसेसमध्ये आसने मोडलेली दिसून येतात, खिडकीच्या काचा पुढे मागे सरकत नाहीत, पावसाळ्यात छत गळत असते, बाहेरील बाजूने पत्रे वाकलेले अथवा बाहेर आलेले असतात. गाड्यांचे सस्पेन्शन ढिले झालेले असते. एसटी बस थांब्यावर येते तेव्हा ती कुठे जाणार आहे याबाबतचा फलक बऱ्याचदा लावलेला नसतो, काही वेळा वाहकांचे प्रवाशांशी बोलणे उर्मटपणाचे असते. एसटी आगाराच्या स्थितीबाबत तर बोलायलाच नको. एसटी आगाराच्या भिंती, प्रसाधनगृह गुटखा-पान खाऊन प्रवाशांनी रंगवलेल्या दिसून येतात, अनेकदा प्रसाधनगृहात पाणी नसते, आगारांमध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याचीही व्यवस्था दिसून येत नाही, असलीच तर त्या ठिकाणची अस्वच्छता पाहिल्यावर बाहेर विकत घेऊन पाणी पिणे सोयीचे वाटते, एसटी आगारात असलेल्या उपहारगृहात नेहमीच पदार्थांची वानवा असते. प्रवाशांच्या सुविधेसाठी उभारण्यात आलेल्या चौकशी कक्षातील कर्मचारी प्रवाशांशी उद्धटपणे बोलत असतात. एखाद्या आगाराचे दुरुस्तीचे काम काढले तर ते पुढे वर्षोनुवर्षे चालूच असते. एसटी महामंडळ हा एक सेवाभावी उपक्रम आहे. या उपक्रमातील त्रुटी दूर करून ग्राहकांचा प्रवास सुलभ आणि सुखकर व्हावा यासाठी राज्य सरकार काही प्रयत्न करणार आहे का ?

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई

पान १ वरून पुढे...

## राजकारणातील सर्वात....

जे त्यांनी स्वीकारले आहे. यामुळे १४व्या नागालँड विधानसभेत छअझझ च्या आमदारांची संख्या २५ वरून ३२ वर पोहोचली आहे. केन्पे यांनी पुढे सांगितले की, या घडामोडीमुळे मुख्यमंत्री नेफ्यू रियो आणि त्यांच्या सरकारच्या कामाला अधिक बळ मिळेल. सत्ताधारी आघाडीतील जागावाटपावर याचा काय परिणाम होईल, या प्रश्नावर त्यांनी कोणताही ठोस फॉर्म्युला नसल्याचे स्पष्ट केले. नागालँडमधील पक्षीय बलाबल

नागालँड विधानसभेत आता NDPP चे ३२ आमदार, तर भाजपचे १२ आमदार- आहेत. याशिवाय, नॅशनल पीपल्स पार्टी (NPP) चे ५, लोक जनशक्ती पार्टी (रामविलास), नगा पीपल्स फ्रंट आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) यांचे प्रत्येकी दोन आमदार, जनता दल (युनायटेड) चा एक आमदार आणि चार अपक्ष आमदार आहेत. एनसीपीच्या नेत्यांशी किंवा पाला बदललेल्या आमदारांशी संपर्क साधता आला नाही.

राजकीय भविष्य काय? या विलयामुळे नागालँडमधील राजकीय परिस्थितीवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. NDPP ची ताकद वाढल्याने सत्ताधारी आघाडीला अधिक स्थैर्य मिळेल. दुसरीकडे, अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील एनसीपी गटाची ताकद कमी झाल्याने त्यांच्यासमोरील आव्हाने वाढली आहेत. या घडामोडींचा परिणाम भविष्यातील निवडणुकींवर आणि पक्षीय रणनीतींवर कसा होईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ईदच्या आधी....

आली आहे. गौसेवा आयोगाने २७ मे रोजी सर्व एपीएमसींना एक परिपत्रक जारी केले होते. ज्यामध्ये असे म्हटले होते की, बकरी ईद दरम्यान मोठ्या प्रमाणात जनावरांची कुर्बानी दिली जाते. त्यामुळे जूनच्या पहिल्या आठवड्यात कोणत्याही गावात पशु बाजार आयोजित करू नयेत जेणेकरून गोवंश हत्याकांडाच्या घटना रोखता येतील. आयोगाने महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायद्याअंतर्गत हा आदेश लागू केला आहे. जो राज्यात गोवंश हत्या करण्यास सक्त मनाई करतो. आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी स्पष्ट केले की, हा आदेश केवळ एक सल्ला होता. त्याचा उद्देश केवळ बेकायदेशीर कत्तल रोखणे आणि इतर प्राण्यांच्या व्यापारावर कायमची बंदी घालणे नाही. या निर्णयाला अनेक समुदायांनी, विशेषतः मुस्लिम समुदायाने विरोध केला आहे. त्यांनी असा प्रश्न उपस्थित केला आहे की, संपूर्ण आठवडा बाजार बंद ठेवण्याची काय गरज होती. कारण

पान १ वरून पुढे...

या निर्णयाचा परिणाम केवळ गुरांवरच नाही तर शेळ्या, मेंढ्या आणि म्हशींच्या व्यापारावरही होणार आहे. वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष फारुख अहमद यांनी नांदेडमध्ये या परिपत्रकाचा निषेध करताना म्हटले आहे की, बाजार बंद केल्याने शेतकरी, कामगार, कुरेशी खाटिक समुदायातील लोक आणि इतर संबंधित व्यावसायिकांचे जीवनमान विस्कळीत होईल. फारुख यांनी गौसेवा आयोगाच्या अधिकारक्षेत्रावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि म्हटले की, आयोगाला फक्त सत्ता देण्याचा अधिकार आहे. थेट आदेश देणे हे त्याच्या कार्यक्षेत्राबाहेर आहे. महाराष्ट्रात एकूण ३०५ प्रमुख आणि ६०३ लघु कृषी उत्पन्न मंडळ समित्या आहेत. ज्या अंतर्गत राज्यातील २९२ पशुबाजार येतात. या बाजारपेठा शेतकरी समुदायासाठी विशेष महत्त्वाच्या आहेत जिथे ते पावसाळा आता की पशुधनाची खरेदी-विक्री करतात, शेतीसाठी जनावरांचा वापर करतात आणि नंतर त्यांच्या देखभाल खर्चामुळे कापणीनंतर त्यांची विक्री करतात.

बकरी ईद दरम्यान मुस्लिम समुदायाचे लोक जनावरे खरेदी करतात म्हणून या बाजारात मेंढ्या, बकऱ्या आणि लहान प्राण्यांची खरेदी वाढते. या सर्व क्रियाकलापांवर एका आठवड्यासाठी बंदी घालण्याचा आदेश हा मोठा व्यावसायिक आणि सामाजिक परिणामांचा विषय बनला आहे. या वादाच्या पार्श्वभूमीवर, गौसेवा आयोगाने स्पष्ट केले आहे की, त्यांचे एकमेव उद्दिष्ट गायी आणि बैलांच्या बेकायदेशीर कत्तलीला प्रतिबंध करणे आहे. जर पशुबाजार खुले राहिले तर ईदच्या काळात कुर्बानींसाठी जनावरांची खरेदी-विक्री वाढेल आणि बेकायदेशीर कत्तलीची शक्यता जास्त असेल, असे आयोगाचे मत आहे.

## महिलाच नव्हे....

बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले की, गेली ७७ वर्ष ऊन, वारा पाऊस याची तमा न बाळगता चांद्यापासून बांद्यापर्यंत आणि गाव खेड्यापासून आदिवासी पाड्यापर्यंत समाजातील सर्व घटकांना सातत्याने प्रवासी सेवा देण्याचं काम एसटीने अविरतपणे केलेत आहे. भविष्यात एसटी आपला शतकोत्तर महोत्सव निश्चित पूर्ण करेल, कारण महाराष्ट्रातल्या सर्व सामान्य जनतेचा आशीर्वाद आणि पाठबळ एसटीला मिळालेला आहे.

७५ वर्षांपेक्षा जास्त काळ टिकून राहिलेल्या खूप कमी संस्था देशात अस्तित्वात आहेत. अर्थात, एसटी महामंडळ त्यापैकी एक आहे. आज ७७ वर्षानंतर देखील महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील एसटीचे महत्त्वयत किंचितही कमी झालेलं नाही. त्यामुळे लोकाश्रय लाभलेली आपली एसटी भविष्यात अशीच मार्गक्रमण करत राहील, असा मला विश्वास वाटतो. भविष्यात दळणवळण क्षेत्रात होणारे संभाव्य बदल लक्षात घेता

पान १ वरून पुढे...

प्रवाशांना अधिक सुरक्षित आणि स्वच्छ अशी स्मार्ट एसटी उपलब्ध करून देण्याचा आपला मानस आहे. असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले. यावेळी बस फॉर असं या एसटीप्रेमी संस्थेने तयार केलेले गेल्या ७७ वर्षातील एसटीचा प्रवास चित्रमय रित्या दाखवण्यात आलेले एसटीचा वाहननामा हे कॉफी टेबल पुस्तक मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. यावेळी एसटीतील सर्वोत्कृष्ट अधिकाऱ्यांचा अध्यक्ष सुवर्णपदक देऊन गौरव करण्यात आला. त्यामध्ये धुळे नंदुरबार विभागाचे विभाग नियंत्रक विजय गीते साक्री आगाराचे आगार व्यवस्थापक सुनील महाले, धुळे-नंदुरबार विभागाचे यंत्र अभियंता पंकज महाजन, जालना विभागाचे यंत्र अभियंता सुरेंद्र तांदळे व सिंधुदुर्ग विभागाचे स्थापत्य अभियंता अक्षय केंकरे यांचा मंत्री सरनाईक यांच्या हस्ते सुवर्ण पदक व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना सवलत

कमी गर्दीच्या हंगामामध्ये प्रवाशांची संख्या वाढावी या उद्देशाने लांब पल्ल्याच्या प्रवासादरम्यान आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना तिकीट दरामध्ये १५ टक्के सवलत देण्याची घोषणा यावेळी मंत्री सरनाईक यांनी केली त्यानुसार येत्या जुलैपासून ही योजना कार्यान्वित होणार आहे. याचा फायदा ई- शिवनेरी सारख्या बसने प्रवास करणाऱ्या अनेक लोकांना होणार आहे.

## परळीत संतापजनक....

ठिकाणी जात याचा व्हिडिओ देखील चित्रित केला, असून आता हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणात कारवाई करावी व यापुढे असे प्रकार होणार नाहीत अशी दक्षता घेण्याची मागणी आता भाविकांमधून केली जात आहे.

## मराठा आंदोलनाला....

घेण्यात आलं. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील पोखरापूर येथील वर्षाराणी सत्यवान दळवे यांची कुणबी मराठा नोंद सापडली. त्यानंतर त्यांना ओबीसी प्रमाणपत्र मिळालं. माहेरी मिळालेल्या मराठा कुणबी प्रमाणपत्राच्या आधारे त्यांनी सासरी तुळजापूर येथील कुंभारी गावात रिक्त झालेल्या सरपंच पदाच्या पोटनिवडणुकीत उमेदवारी दाखल केली होती. शुक्रवारी सरपंच निवडीसंदर्भातील बैठक झाली. त्यावेळी वर्षाराणी दळवे या बिनविरोध निवडून आल्या.

पोटनिवडणुकीत विजय

पोखरापूर येथील वर्षाराणी सत्यवान दळवे यांची कुणबी मराठा नोंद सापडली. त्यांचे सासरकडील नाव वर्षाराणी संतोष वडणे असे

पान १ वरून पुढे...

आहे. त्यानंतर त्यांना ओबीसी प्रमाणपत्र मिळालं. माहेरी मिळालेल्या मराठा कुणबी प्रमाणपत्राच्या आधारे वर्षाराणी दळवे यांनी कुंभारी येथे पोटनिवडणूक लढवली. कुंभारी गावात रिक्त झालेल्या सरपंच पदावर इतर मागास प्रवर्गातून लढत त्यांनी विजय मिळवला. त्यांची सरपंच म्हणून निवड झाली. शुक्रवारी ३० मे रोजी झालेल्या बैठकीत सरपंचपदी त्यांची बिनविरोध निवड झाली. मराठा आंदोलनानंतर त्या मराठा कुणबी पहिल्या महिला सरपंच असल्याचं सांगितले जाते. सकल मराठा समाजाकडून तुळजापुरात त्यांचा जंगी सत्कारही करण्यात आला. त्यांच्या माहेरी पण या निवडीबद्दल आनंद व्यक्त करण्यात आला आहे.

## रिंकू सिंहची...

राहतील. रिंकू याच्या होणाऱ्या पत्नीचे नाव प्रिया सरोज आहे. ती समाजवादी पार्टीची खासदार आहे. २०२४ मध्ये झालेल्या निवडणुकीत ती मछलीशहर मतदारसंघातून निवडणूक लढली आणि जिंकली होती. तिने बीपी सरोज यांचा ३५८५० मतांनी पराभव केला होता.

दरम्यान, याच वर्षी जानेवारी महिन्यात रिंकू आणि प्रिया सरोज यांच्या लग्न पक्के झाले होते आणि सुपारी फुटली होती. आता लग्नाची तारीख देखील निश्चित झाली असून ८ जून रोजी दोघे एकमेकांच्या बोटात रिंग घालतील. तर १८ नोव्हेंबर दोघे एक दुजे के होतील.

## बडतर्फ पोलीस....

बीड, परळी, अंबाजोगाई यासह मुंबईतही गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. आता नव्याने दोन गुन्हे दाखल झाल्याने कासले समोरील अडचणी वाढण्याची शक्यता असतानाच रणजीत कासलेला दिल्लीतून अटक केल्याची माहिती समोर आली आहे. रणजीत कासले याला आठवडाभरापूर्वी जामीन मिळाला होता. जामीन मिळाल्यानंतर त्याने सोशल मीडियावर व्हिडिओ शेअर करत त्याने आपले आरोप सत्र सुरूच ठेवले होते. अशातच शनिवारी (२५ मे) रणजित कासले याने एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला.

या व्हिडीओत त्याने म्हटले होते की, कराडला तुरुंगात खास चहा दिला जातो, तसेच त्याच्या जेवणात चांगल्या प्रतीच्या चपात्यांची विशेष व्यवस्था केली जाते. इतकंच नाही, तर तो स्वतःसह इतर कैद्यांच्या नावावर तुरुंगातील कँटीनमधून दरमहा तब्बल २५ हजार रुपयांची खरेदी करत असल्याचा दावा त्याने केला होता. त्यानंतर कराडला मिळत असलेल्या व्हीआयपी ट्रीटमेंटच्या आरोपानंतर कारागृह अधीक्षकांची बदली करण्यात आली आहे.

पान ४ वरून पुढे...

## आजच्या रॅलीमध्ये...

परिसरातील सुशोभीकरणाचं काम चालू केलेला आहे व ते लवकरच पूर्ण करण्यात येईल व उद्या एक जून रोजी सायंकाळी पाच वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड शहर या ठिकाणाहून छत्रपती संभाजी महाराज चौक म्हणजेच लक्ष्मी चौक बीड बायपास या ठिकाणापर्यंत भव्य मोटरसायकल रॅलीचे आयोजन केलेले आहे तरी सर्व शिवशंभु प्रेमींनी व बिडकर यांनी उद्या सायंकाळी पाच वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड शहर या ठिकाणी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे .

## बिंदुसरा धरणाच्या...

बिंदुसरा धरणाच्या मुख्य चादरीवर वड, पिंपळ,लिंबासारखी झाडे उगवल्याचे आम्ही ३ वर्षांपासून निदर्शनास आणुन देऊन प्रशासनाला निवेदन देऊनही प्रशासन दुर्लक्ष करत असुन ही झाडे जशजशी वाढत जातील.तसातसा धरणाच्या रचनेला धोका वाढेल.आज नाही तर ऊद्या त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील.अनेक किल्ले, गड, ईमारती अशा झाडांमुळे ढासळलेली आपण पाहतो.त्यामुळे शासनाने तातडीने दखल घेऊन हि झाडे काढण्यात यावीत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रामनाथ खोड यांनी केली आहे.

## दिंद्रुड पोलीस...

कार्यकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संजीवनी राऊत,हनुमान फपाळ, नवनाथ कांबळे, पोलीस कॉन्स्टेबल महादेव डाके यांनी सदिच्छा भावना व्यक्त करत अधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

आपल्या भाषणात सपोनी महादेव ढाकणे यांनी कायदा व

पान ४ वरून पुढे...

सुव्यवस्था राखताना कायद्याचा कोणी अवमान करणार नाही यासाठी आपण काम करणार आहोत, अन्याय झालेल्या व्यक्तींवर परस्पर गुन्हा नोंद होताना आपण काळजी घेणार आहोत, कर्तव्याबाबत कुठलीही तडजोड खपवली जाणार नसल्याचे सांगितले. सपोनी अण्णाराव खोडेवाड व पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल भोजगुडे यांनी दिंद्रुड परिसरात काम करताना येथील सकारात्मक विचारांच्या लोकांमुळे चांगल्या प्रकारे काम करण्यात आल्या बाबत आनंद व्यक्त केला. प्रस्ताविक पोलीस उपनिरीक्षक सलमान शेख, सूत्रसंचालन संतोष स्वामी, आभार नागेश कानडे यांनी व्यक्त केले.

## अंबाजोगाईत सेवानिवृत्त...

निवृत्त शिक्षिकेला फोन केलेल्या भामट्यांनी सांगितले.

संजय पिसे नावाच्या व्यक्तीने व्हाट्सअप व्हिडिओ कॉल करून आधी या निवृत्त शिक्षिकेला मुंबई पोलिसांचे बनावट ऑफिस, झेंडे,लोगो दाखवून डिजिटल अरेस्ट केली. त्यानंतर भीती दाखवून २१ ते २९ मे या दरम्यान तब्बल ८३ लाख १ हजार ८१६ रुपये उकळले. विशेष बाब म्हणजे निवृत्त शिक्षकेने भीतीपोटी सोने प्लॉट गहाण ठेवून त्यावर कर्ज काढत ही रक्कम दिल्याचे सांगितले.३० मे रोजी गुन्हेगारांनी व्हाट्सअप वरून ब्लॉक केल्यानंतर त्यांना त्यांची फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी सायबर पोलीस ठाणे गाठत फिर्याद दिली त्यानुसार शनिवारी सायबर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सायबर पोलीस करत आहेत.

फसवणूक झालेल्या शिक्षिकेने भीतीपोटी स्वतःचे सोनं आणि प्लॉट गहाण ठेवून कर्ज घेतलं आणि ती रक्कम भामट्यांना ट्रान्सफर केली. अखेर

पान ४ वरून पुढे...

३० मे रोजी व्हॉट्सपवरून अचानक संपर्क तोडण्यात आला. त्यानंतर फसवणूक लक्षात येताच त्यांनी अंबाजोगाई सायबर पोलिस ठाण्यात धाव घेतली आणि तक्रार दाखल केली. सायबर पोलिसांनी याप्रकरणी शनिवारी गुन्हा दाखल केला असून, अधिक तपास सुरू आहे.

## एसएफआयच्या 19व्या...

एसएफआयने कायमच संघर्ष केला आहे. सरकारी शाळा बंद करण्याचे धोरण रद्द करणे, नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण रद्द करणे

, शैक्षणिक संस्थांमधील लोकशाही बळकट करणे,शिक्षण, रोजगार आणि विकास यांच्यातील समन्वय साधणारे धोरण राबवणे, त्रिभाषा सूत्र आणि हिंदी सक्तीविरोधातील भूमिका या व अन्य विद्यार्थी प्रश्नांवर आगामी काळातील संघटनेची नियोजन करण्यात येणार आहे.

या अधिवेशनात वरील शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि संघटनात्मक मुद्द्यांवर सखोल चर्चा व विचारमंथन करण्यात येणार आहे. अधिवेशनात आगामी काळातील कामाचा आराखडा निश्चित केला जाईल आणि काही महत्त्वाचे ठराव मांडले जातील. राज्यभरातून ३०० हून अधिक विद्यार्थी प्रतिनिधी या अधिवेशनात सहभागी होत आहेत. बीड जिल्ह्यातूनही विद्यार्थी प्रतिनिधींचा उत्स्फूर्त सहभाग असल्याची माहिती एसएफआयचे राज्य सहसचिव लहू खारगे, राज्य सचिवमंडळ सदस्य संतोष जाधव, राज्य उपाध्यक्ष व जिल्हाध्यक्ष सत्यजित मस्के, जिल्हा सचिव पवन चिंचाने, राज्य कमिटी सदस्य अंकुश कोकाटे यांनी दिली आहे.

## आदर्श देवगाव...

पान ४ वरून पुढे...

कर्तृत्वाने भारतभर त्यांनी मोठी किर्ती आणि नवलौकिक मिळवले.

संपूर्ण भारतभर मंदिरे बांधणे मंदिराचा जीर्णोद्धार नद्यावर घाट बांधणे पिण्याच्या पाण्यासाठी विहीरी खोदणे. धर्मशाळा बांधणे अन्नछत्र चालवणे आधी लोक कल्याणकारी कार्याच्या खुणा आजही भारतभर दिसून येतात.

आज आदर्श देवगाव या ठिकाणी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक व ग्रामपचांयत कार्यालय येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यांदेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करताना उपस्थित गावचे सरपंच उपसरपंच .ग्रामपंचायत सदस्य विविध क्षेत्रातील कार्यरत असणारे व्यक्ती, गावातील नागरिक युवक उपस्थित होते, व मोठ्या उत्साहात व जल्लोषात जयंती साजरी करण्यात आली.

## तेलगावजवळ अपघात...

ग्रामस्थांनी गोंधळ घातला होता. सध्या स्थितीत चार वाजेपर्यंत दोन्ही बाजूने दोन ते तीन किलोमीटर पर्यंत वाहनांच्या रांगा लागलेल्या असून जोपर्यंत कारवाई होणार नाही तोपर्यंत प्रेत उचलू देणार नाहीत ही भूमिका घेतली आहे.

## बेघरांचे आश्रयस्थान...

से निअभियंता कांचन गायकवाड, सौ. गायकवाड, बीड शहर बचाव मंच चे निमंत्रक नितीन जायभाये,मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ संजय तांदळे, लेक लाडकी अभियानचे बाजीराव ढाकणे होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचलन केंद्राचे संचालक राजू वंजारे यांनी तर निमंत्रितांचे आभार दुसरे संचालक अभिजित वैद्य यांनी मानले .

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# स्पर्धेच्या जगात प्रत्येक वेळी स्वत:ला सिद्ध करावे लागेल

## जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी विद्यार्थ्यांना दिला यशाचा कानमंत्र; बीड जिल्हा व्यापारी महासंघाकडून गुणवंतांचा गौरव

**बीड । प्रतिनिधी**

दहावीचे यश हे जीवनामध्ये अतिशय महत्त्वाचा आहे कारण की या पॉईंटवर आयुष्याला एक महत्त्वाचं वळण लागतं. दहावी, बारावी मध्ये जास्त मार्क्स मिळाले म्हणजे सर्व काही मिळाले असे नाही तर स्पर्धेच्या जगामध्ये आता प्रत्येक क्षणाला स्वतःला सिद्ध करावे लागेल जो विद्यार्थी या सर्व क्षणांना या परीक्षांना तयार राहतो तो आपले ध्येय प्राप्त करतो असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले. बीड जिल्हा व्यापारी महासंघ बीड शहर व तालुकाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी जॉन्सन बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष भास्करराव जाधव, कार्याध्यक्ष अशोक शेटे, शहराध्यक्ष प्रकाश कानगावकर, तालुकाध्यक्ष राजेंद्र बनसोडे, महासचिव तुकाराम साळुंके, सचिव गंगाबिशन करवा, शहरसचिव सुर्यकांत महाजन, तालुका सचिव बाळासाहेब तिवारी व वाय जनार्दन राव यांची प्रमुख उपस्थिती होती.





कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्याध्यक्ष अशोक शेटे यांनी केले. ते म्हणाले, व्यापार करत असताना ज्या समाजाचे आम्हाला सहकार्य लाभते त्या समाजाला आम्ही काही देणे लागतो या भावनेतून या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. तसेच व्यापारी जसा व्यवसायात मेहनत घेतो, येणार्या अडचणीवर मात करत व्यवसायात यशस्वी होतो तसेच विद्यार्थ्यांनी सुद्धा अभ्यासात मेहनत घेऊन यशस्वी व्हावे असे सांगितले. जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी आपल्या यशाचे रहस्य सांगतांना माझ्यात एक अभ्यासूपणा होता, पण ध्येय निश्चित केल्याशिवाय मी केलेल्या अभ्यासाचा फायदा होणार नाही म्हणून माझ्या आई-वडिलांच्या मार्गदर्शनात मी ध्येय निश्चित केले. जे आज फलश्रूत झाले आहे. आपण कितीही मोठे झालो आणि कुठेही असलो तरी आपण आपल्या मातृभूमीला विसरता कामा नये. कारण ज्या मातीतून आपल्याला आकाशाला गवसणी घालण्याची शक्ती मिळाली त्या मातृभूमीला विसरून चालणार नाही तर त्या मातृभूमीसाठी आपल्याला विकासात्म कर्तव्याची जाणीव असली पाहिजे असेही जॉन्सन यावेळी म्हणाले. व्यापारी महासंघाचे अध्यक्ष भास्करराव जाधव यांनी महासंघाच्या कामकाजाविषयी माहिती दिली. यावेळी जवाहरलालजी कांकरिया, मदनसेठ दुग्गड, सुशील खटोड, आसाराम जी मानधने, मुकेश अग्रवाल, गंगाबिशनजी करवा यांची उपस्थिती होती. आभार प्रदर्शन प्रकाश कानगावकर यांनी केले. यावेळी व्यापारी,पालक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य सर्वांना प्रेरणादायी :उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील

**सोलापूर । प्रतिनिधी**

रणरागिणी, राजमाता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी सबंध भारतभर बारा हजाराहून अधिक मंदिरांचा जिर्णोद्धार केला. पाण्यासाठी पाणवठे तसेच बारवे निर्माण करून जलव्यवस्थापनाचे उत्कृष्ट कार्य केले. त्यांचा आदर्श राज्यकारभार, युद्धनीती, न्यायव्यवस्था यातून सर्वांनाच प्रेरणा मिळते, असे गोरवोद्गार राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री



श्री चंद्रकांतदादा पाटील यांनी काढले. शनिवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामार्फत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त विद्यापीठात आयोजित विविध कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील बोलत होते. यावेळी व्यासपीठावर राज्याचे ग्राम विकास, पंचायतराज मंत्री व सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार रणजीतसिंह मोहिते-पाटील, कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर, महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# नूतन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी कार्यभार स्वीकारला

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

नूतन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज आपल्या पदाचा कार्यभार स्विकारला. सेवानिवृत्त होत असलेले विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्याकडून त्यांनी पदभार स्विकारला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर आयुक्त अनंत गव्हाणे, अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी यांनी श्री पापळकर यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. ावेळी नगरविकास विभागाचे सहआयुक्त देविदास टेकाळे यांच्यासह प्रादेशिक विभागप्रमुख उपस्थित होते. विभागीय आयुक्त श्री पापळकर यांनी विभाग प्रमुखांशी संवाद साधत विभागातील माहिती जाणून घेतली. नवनियुक्त विभागीय आयुक्त श्री. पापळकर हे २०१० च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. त्यांनी यापूर्वी चंद्रपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणून काम पाहिले आहे.



# परशुराम संस्कार सेवा संघाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी कायम वाचन, मनन, चिंतन करुन आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास साधण्यासाठी गुणवत्तेत सातत्य ठेवणे हे विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोणातून अत्यंत महत्वाचे आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ विधिज्ञ अ‍ॅड.कालिदास (नाना) थिगळे यांनी परशुराम संस्कार सेवा संघाच्यावतीने आयोजित केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी केले.

परशुराम संस्कार सेवा संघाच्यावतीने इयत्ता १० व १२ वी परिक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे बीड शहरातील अंकुशनगर भागातील साई-पंढरी मंगल कार्यालयात रविवार



(दि.१ जून) रोजी आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीप प्रज्वलित करुन करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विधिज्ञ अ‍ॅड.कालिदास (नाना) थिगळे होते तर यावेळी पत्रकार प्रशांत सुलाखे, उद्योजक बाळासाहेब थिगळे, प्रा.संजयराव पत्की, सुषमाताई थिगळे, बाबा पाठक यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलतांना अ‍ॅड. थिगळे म्हणाले की, जीवनात आलेल्या कठीण प्रसंगाला कधीही डगमगून जायचे नाही तर त्या कठीण प्रसंगांना सामोरे जावून यशाचे शिखर गाठाण्यासाठी जिद्द,चिकाटी आणि मेहनत करायला हवी. स्पर्धेच्या युगात जर टिकायचे असेल तर कठोर परिश्रम करण्याची तयार असणे आवश्यक आहे असेही अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते म्हणाले.

यावेळी परशुराम संस्कार सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष गजानन जोशी यांच्यासह मान्यवरांची समायोचित व मार्गदर्शनपर भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुकूंद खडकीकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार अर्जनाताई जोशी, विनायकराव देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रवण थिगळे, ज्योतीताई थिगळे, थिगळे काका यांनी बहुमोल परिश्रम घेतले. यावेळी गुणवंत विद्यार्थी, पालक, परिसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री नारायण विद्यालयात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती साजरी



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथील श्री नारायण मा. व उ. मा. विद्यालयात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती साजरी करण्यात आली.

श्री नारायण विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष श्री महादेवराव काळे (अण्णा), प्राचार्य तथा सचिव श्री अमोल काळे सर उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी पुण्यश्लोक अहिल्याबाई यांच्या प्रतिमेला हार घालून अभिवादन केले. सूत्रसंचालन प्राध्यापक अशोक घरत सर यांनी केले तर प्रास्ताविक प्रा. धर्मराज पौळ सर यांनी केले आभार प्रदर्शन प्रा. प्रवीण रकटे सर यांनी मानले. यावेळी कार्यक्रमाला शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

# तुम्ही भावनिक नात्यांमध्ये गुंतलेले आहात का? थांबा...

व्यक्ती जगत असताना एकट जगू शकत नाही. जीवन जगत असताना आपल्या काही वैयक्तिक, भावनिक, शारीरिक, सामाजिक आणि कौटुंबिक, आर्थिक गरजा असतात. त्या पूर्ण न झाल्यास आपल्याला त्रास होतो. काही नैसर्गिक गरजा सुद्धा असतात. त्या पूर्ण होण्यासाठी आपण काही विशेष नाती जोडतो.

उदा. मैत्रीचे, प्रेमाचे, कौटुंबिक किंवा कामाशी संबंधित असो हि नाते भावनिक गुंतवणूक या नावाने ओळखली जातात.

पण आपण सोशल मीडिया, वृत्तपत्र, बातम्या यांच्या माध्यमातून आपण पाहतो आणि ऐकतो की या सर्व नात्यांमध्ये धोका,त्रास, विश्वासघात,अन्याय इ. होत आहेत.असे अनेक अनुभव आपल्या प्रत्येकाच्या जीवनामध्ये येत असतात. प्रत्येक व्यक्ती वरील सर्व अनुभव घेत असतो आणि याचाच त्रास होत असतो.ही नाती आपल्याला सर्वाधिक त्रास देतात कारण आपण या नात्यांमध्ये जास्त गुतलेलं असतो. म्हणून सर्वाधिक त्रास, वेदना कालांतराने होतात यामागे मानसशास्त्र काय सांगते ? नेमकं काय घडत हे आपण पाहूया ....

आता प्रश्न हा पडतो की भावनिक गुंतवणूक म्हणजे काय ?

तर एखाद्या व्यक्तीकडे आपली मानसिक, भावनिक, शारीरिक ऊर्जा वळवणे होय यालाच भावनिक गुंतवणूक असे म्हणतात.

म्हणजेच त्याचं बोलणं, त्याचं वागणं, त्याची स्टाईल, वर्तणूक, प्रतिक्रिया, सौंदर्य, प्रेमात इतके संवेदनशील होतो की आपण सर्वस्व त्यालाच मानायला लागतो. मग दिवस-रात्र त्याचाच विचार त्याची चित्र आपल्या मनामध्ये खेळत असतात. मग आपल्याला त्याच्याविना टाईम जात नाही. जेवण सुद्धा जात नाही.कालांतराने आपला मूळ निर्णय व जगण्याची दिशाच त्याच्यावर अवलंबून राहते.

गुंतवणुकीची काही प्रकार आहेत.

१. व्यावसायिक गुंतवणूक... सहकारी,बॉस, क्लाइंट.

२. अध्यात्मिक/मानसिक गुंतवणूकगुरु, आदर्श व्यक्ती, सेलिब्रिटी.

३. नात्यातील गुंतवणूककुटुंब, मैत्री, प्रेम संबंध.

प्रत्येक व्यक्तीला नात्यात विश्वास, सुरक्षिततेची गरज असते. पण त्याचं रूपांतर आपण अपेक्षा मध्ये करतो.

उदा. भविष्यात प्रत्येक ठिकाणी तो/ती मला समजून घेईल. माझी खूप काळजी घेईल. प्रामाणिक राहील पण सर्व भावना या पूर्ण होतीलच असे नाही. कारण प्रत्येक व्यक्ती परिपूर्ण नसतो. त्याच्याकडून पण काही चुका होऊ शकतात. हे मात्र आपण विसरतो. म्हणून आपल्याला वेदना होतात. आपण त्या व्यक्तीशी इतकं जुळतो/गुंततो की आपली स्वतःची ओळखच त्याच्या आधारावर तयार करतो.



उदा. तो माझा नवरा आहे, ती माझी पत्नी आहे, तो माझा बेस्ट फ्रेंड आहे, तो /ती माझा /माझी आहे.

पण जेव्हा हे नातं कालांतराने काही कारणास्तव तुटत तेव्हा खूप वेदना, त्रास होतो. स्वतःचं अस्तित्व गमावल्यासारखं वाटतं हे मानसिक दृष्ट्या खूपच धोकादायक असतं खूप भयानक असतात. जेव्हा आपण स्वतःच्या भावनिक गरजा पूर्ण करण्यासाठी दुसऱ्यावर अवलंबून असतो. तेव्हा त्या न पूर्ण झाल्यास जगण्याची प्रेरणाच उरत नाही. आपण कोसळतो. स्वतःच्या भावना गमावतो. आपलं बोलणं, वागणं, निर्णय घेणे त्याच्यावरच अवलंबून असतं.

याला मानसशास्त्रामध्ये External locust of control म्हणतात.

आपण आपल्या अपूर्ण गरजा, भूतकाळातील जखमा किंवा एकटेपणाच्या भावना दुसऱ्यावर प्रोजेक्ट करतो.

मग हताश होतो. निराश होतो. उदास होतो. आणि कोसळतो चुकीच्या कृती/आत्महत्या सारखे पाऊल उचलतो.

कारण सुरुवातीला जवळीकता, हुरूप, प्रेमळ सहवास नवीन असतो.त्या व्यक्तीच्या चांगल्या गोष्टी पाहतो म्हणून आपल्या मेंदूतून काही आनंदी रसायन (हार्मोन्स )आपल्या पिऊशी ग्रंथी मधून स्त्रावत असतात. म्हणून अधिकच उत्साह,ऊर्जावान आपल्याला वाटतो आणि त्या व्यक्तीचा सहवास हवाहवासा वाटतो.

पण ती व्यक्ती परिपूर्ण नसते, तिच्याकडून पण काही चुका होऊ शकतात.सर्व काही तुम्हाला ती देऊ शकत नाही. हे वास्तव आपण विसरून जातो. आपल्या अपेक्षा एवढ्या वाढतात म्हणून एर्रिंहू कमी होते. जुपर्शीहळविाढते.

म्हणून आपले निर्णय, भविष्यातील विचार त्या व्यक्तीशी निगडित होतात. स्वतःचे विचार विसरतो. मग आपला भ्रम निराश होतो. भावनिक वेदना वाढतात. म्हणून एन्सायटी,डिप्रेशन सुरू होते. नकारात्मक विचारा करून चुकीचे पाऊल उचलल्या जातात. पण असे न करता तुम्ही अनुभवी मानसशास्त्रज्ञ/ समुपदेशकाची मदत घेऊ शकता. तसेच खालील काही उपाययोजना करू शकता

स्वतःच्या भावना बॅलन्स ठेवा. कोणत्याही नात्यांमध्ये अडकला असाल तर सुरुवातीलाच काही सीमारेखा ठेवा. स्वतःचे सुख दुसऱ्यांमध्ये कधीच सापडू नका.

आपल्या भावना,गरजा, निर्णय याचे केंद्रबिंदू स्वतःच बना. ती व्यक्ती आहे म्हणून मी आनंदी आहे. अशी खोटे आश्वासन स्वतः ला देऊ नका.

स्वतःच्या मर्यादा स्पष्ट ठेवा. वेळ, संवाद,अपेक्षा यामध्ये संतुलन ठेवा.

स्वतःची संवाद साधा/ प्रश्न विचारा.

मी या नात्यात का अडकलो आहे. माझ्या गरजा काय आहेत. याचे उत्तर शोधा. कारण शोधलं की सापडतं व स्वतःची सुटका स्वतःच करून घ्या.

आपली भावनिक गुंतवणूक एकाच व्यक्तीशी न करता त्याला वेगवेगळ्या भागात विभागणी करा.

उदा... मेडिटेशन,प्राणायाम,व्यायाम, कुटुंब, आपले छंद, वाचन,नैसर्गिक नाते,समाजकार्य, काम (नोकरी, व्यवसाय), नवनवीन गोष्टी शिका.

वरील सर्व गोष्टी करून सुद्धा तुम्ही गोंधळले असाल उदास असाल काही सुचत नसेल तर घाबरू नका खालील नंबर वर कॉल करा.

**- नीषा घुले ( बिक्कड ), कौन्सलर सायकॉलॉजिस्ट.**
**मो. नं. ९५४५४४०४७१**

CMYK

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र

सोमवार, दि.०२ जून २०२५ पान ४

## आजच्या रॅलीमध्ये उपस्थित रहा

**बीड । प्रतिनिधी**



शहरामध्ये प्रथमच धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा स्मारक आपण महालक्ष्मी चौक येथे बसवलेलं आहे तर त्याच निमित्ताने श्री गुरुवर्य संभाजीराव भिडे गुरुजी यांच्या हस्ते आपण १ जून रोजी आपण स्मारकाचा ऐतिहासिक भव्य दिव्य अनावरण सोहळा आयोजित केलेला होता पण काही कारणास्तव गुरुजींच्या सांगण्यावरून हा अनावरण कार्यक्रमाचा सोहळा आपण काही कालावधीसाठी पुढे ढकलत आहोत याची सर्व बीड करांनी व सर्व शिवशंभु प्रेमींनी नोंद घ्यावी व हाच स्मारकाचा ऐतिहासिक सोहळा तेवढ्याच ताकतीने तेवढ्याच उत्साहाने करण्यात येईल व लवकरच तारीख कळवण्यात येईल तोपर्यंत आपण छत्रपती संभाजी महाराज स्मारक ▶▶ उर्वरित पान २ वर

# बिंदुसरा धरणाच्या मोठ्या चादरीवर वड - पिंपळाची झाडे ; संभाव्य धोक्याकडे दुर्लक्ष

## नागरीकांना सतर्कतेचे आवाहन करणारे जिल्हा प्रशासन बेफिकीर : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या महत्वाच्या बिंदुसरा धरणाच्या मुख्य चादरीवर वड, पिंपळ आणि लिंबासारखी झाडे उगवली असुन चादरीच्या बांधकामासाठी धोकादायक ठरणा-या झाडांची छाटणी व काढणी करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे ३ वर्षांपासून करून सुद्धा पाटबंधारे विभाग आणि जिल्हा प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे धरणाच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे . तज्ञांच्या मते झाडांच्या वाढत्या मुळांमुळे पाणी झिरपण्याची प्रक्रिया आधिक सुलभ होते.जी भविष्यात चादरीला तडे जाणे,गळती होणे किंवा पुर्ण रचना कोसळण्यास कारणीभूत ठरू शकते.यामुळे शहराच्या जलस्त्रोतासह हजारो नागरीकांच्या जिवितास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे प्रशासनाने तातडीने चादरीवरील अशी जीर्ण झाडे हटवून भिंतीची डागडुजी करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि रामनाथ खोड यांनी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी बीड, कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग क्रमांक ३ यांना केली आहे.

११ सप्टेंबर २०२२ रोजी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त बीड शहरापासून बिंदुसरा धरणापर्यंत बिंदुसरा नदीच्या काठांवर प्रत्येकी ८ अशा १६ किलोमीटर अंतर लांबीच्या परीसरात मानवी साखळी पद्धतीने बांबुची ५ हजार ९७० रोपट्यांची लागवड करण्यात आली होती. तेव्हा बिंदुसरा धरणाच्या पायथ्याशी तत्कालीन जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा, पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अजित पवार यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले होते. तेव्हा त्यांना मुख्य चादरीवरील उगवलेली झाडे दाखविण्यात आली होती तसेच लेखी निवेदनाद्वारे झाडे काढण्याची मागणी केली होती मात्र ३ वर्षे उलटुनही अद्याप चादरीवरील झाडे काढण्यात आली नाहीत. त्यामुळे एकंदरीतच नागरीकांना सतर्कतेचे आवाहन करणारे जिल्हा प्रशासन याबाबतीत बेफिकीर असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे प्रत्येक सिंचन प्रकल्पाची पावसाळा सुरू होण्यापूर्वी आणि पावसाळा संपल्यानंतर तपासणी केली जाते.त्या तपासणीत भिंत, सांडवा आदी बाबी पाहिल्या जातात.मग असे असताना बिंदुसरा धरणाच्या मान्सुनपुर्व तपासणीत मुख्य चादरीवर उगवलेली झाडे पाटबंधारे विभागाच्या लक्षात कशी आली नाहीत हा खरा प्रश्न आहे अशी प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली.

▶▶ उर्वरित पान २ वर

## दिंद्रुड पोलीस अधिकारी निरोप व स्वागत समारंभ संपन्न

**दिंद्रुड । प्रतिनिधी**



माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अण्णाराव खोडेवाड यांची नांदेड परिक्षेत्रात व पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल भोजगुडे यांची धाराशिव जिल्ह्यात नुकतीच बदली झाली. नव्याने प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर अंभोरा पोलीस स्टेशनचे सपोनि महादेव ढाकणे यांची नियुक्ती झाल्याबाबत निरोप व स्वागत समारंभाचे आयोजन दिंद्रुड पोलीस ठाणे व पोलीस हद्दीतील ग्रामस्थांच्या वतीने रविवारी सकाळी करण्यात आले होते.

सपोनी खोडेवाड हे दिंद्रुड पोलीस ठाण्याचे २८ महिने या दीर्घकाळात कर्तव्य बजावणारे एकमेव अधिकारी ठरले आहेत. त्यांच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी खोडेवाड यांची भूमिका प्रखर व सक्षम राहिली आहे. उपनिरीक्षक स्वप्निल भोजगुडे या कर्तव्य तत्पर व खमक्या अधिकारी यांनी दिंद्रुड ठाण्याच्या हद्दीतील गुन्हेगारी रोखण्यासाठी तत्परतेने भूमिका निभवली. अन्यायग्रस्तांवर अन्याय होणार नाही व पिडीताला न्याय मिळावा या हेतूने केलेल्या दोन्ही अधिकाऱ्यांच्या कामामुळे दिंद्रुड पोलीस हद्दीतील नागरिकांनी त्यांच्या निरोप समारंभ प्रसंगी हजेरी लावत दोघांनाही आगामी

▶▶ उर्वरित पान २ वर

## अंबाजोगाईत सेवानिवृत्त शिक्षिकेला 83 लाखाला गंडा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**




अंबाजोगाईत एक धक्कादायक घटना उघडकीस आली असून, एका सेवानिवृत्त शिक्षिकेला व्हॉट्सप कॉलवरून 'डिजिटल अरेस्ट' केल्याचा प्रकार घडलाय. सेवानिवृत्त शिक्षिकेला मनी लॉन्ड्रींग आणि अतिरेक्यांना फंडिंग केल्याचं सांगत तब्बल ८३ लाख रुपयांना गंडवण्यात आलं आहे. चौकशीला सहकार्य करा सांगत फसवणूक करणार्या भामट्यांनी विश्वास नांगरे पाटील यांचे नाव घेत ही फसवणूक केलीय.

अंबाजोगाई येथील सेवानिवृत्त शिक्षिकेला मनी लॉन्ड्रीग आणि अतिरेक्यांना फंडिंग केल्याचे सांगत चौकशीला सहकार्य करा असे म्हणत व्हॉट्सप कॉल वरून तब्बल ८३ लाख रुपये हडपल्याचा प्रकार अंबाजोगाईत झाला आहे. तुमच्या आधार कार्ड वरून दुसरे सिम कार्ड घेतले असून त्याचा दुरुपयोग झाल्याचे देखील बनावट कॉलद्वारे सांगण्यात आलेय.आम्ही तुम्हाला या प्रकरणातून सोडवू, यासाठी आम्हाला विश्वास नांगरे पाटील यांनी स्पेशल विनंती केल्याच देखील ▶▶ उर्वरित पान २ वर

## एसएफआयच्या 19व्या महाराष्ट्र राज्य अधिवेशनास आजपासून सुरुवात

**बीड । प्रतिनिधी**

स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय)चे १९वे तीन दिवसीय महाराष्ट्र राज्य अधिवेशन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि संत गाडगे महाराज यांची जन्म व कर्मभूमी असलेल्या नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती येथे संपन्न होणार आहे. या अधिवेशनाच्या निमित्ताने आज, २ जून २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

या सभेसाठी एसएफआयचे अखिल भारतीय अध्यक्ष व्ही. पी. सानू, महासचिव मयुख बिस्वास, डहाणू विधानसभेचे आमदार कॉ. विनोद निकोले, शेतकरी नेते डॉ. अजित नवले, एसएफआयचे राज्य अध्यक्ष सोमनाथ निर्मळ आणि सचिव रोहिदास जाधव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. बीड जिल्ह्यातून मोठ्या संख्येने विद्यार्थी या अधिवेशनात सहभागी होत आहेत. या जाहीर सभेसाठी विद्यार्थी, पालक व शिक्षणप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन एसएफआयच्या वतीने करण्यात आले आहे.

एसएफआय ही देशातील सर्वात मोठी विद्यार्थी संघटना आहे. स्थापनेपासूनच एसएफआयने शिक्षणातील विविध प्रश्नांवर देशभरात आंदोलनांची लढाई उभी केली आहे. सर्वांना समान, मोफत, दर्जेदार आणि रोजगाराभिमुख शिक्षण मिळावे, तसेच विद्यार्थी वर्गाचे हक्क व अधिकार सुरक्षित राहावेत, यासाठी ▶▶ उर्वरित पान २ वर

## आदर्श देवगाव येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर याची ग्रा.पं.कार्यालय मध्ये जयंती साजरी

**वडवणी । प्रतिनिधी**



वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशत्बादी जयंती उत्सहात साजरी करण्यात आली आहे. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी मंदिर जीर्णोद्धार, शेतकऱ्यांसाठी करमाफी, शाळांच्या स्थापनेद्वारे विद्याप्रसार तसेच अंधश्रद्धा निवारण अश्या अनेक समाजोद्धाराची कार्ये केल्या.

दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम अहिल्याबाईंची धर्मनिष्ठा, पराक्रम, प्रशासनकौशल्य यांमुळे भारताच्या इतिहासात त्यांचे नाव सुवर्णाक्षरात लिहिले गेले. त्यांची प्रजा सुखी-समाधानी राहील यासाठी त्या अविरत झटत राहिल्या.संपूर्ण देशभरात यावनी पातशाह्यांनी विध्वंस केलेल्या अनेक मंदिरांचा राजमाता अहिल्याबाईंनी जीर्णोद्धार केला.

अशा 'धर्मपरायण, न्यायनिष्ठ, दानशूर व अतिशय कर्तृत्ववान राज्यकर्त्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

एक अतिशय दानशूर कर्तृत्ववान राज्यकर्त्या म्हणून अहिल्यादेवी होळकर यांचे नाव भारतीय इतिहासात सुवर्णक्षण लिहिले गेलेले आहे . त्यांचे नेतृत्व व न्यायप्रियता आणि समाजासाठी केलेली कार्य आजही प्रेरणादायी ठरतात अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य केवळ प्रेरणादायीच नाही तर ते एक आदर्श राज्यकर्ते चे प्रतीक आहे. त्यांच्यामध्ये राजमाता जिजाऊ नंतर पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांचे अद्वितीय स्थान असून धार्मिक सामाजिक आणि राजकीय

▶▶ उर्वरित पान २ वर

## तेलगावजवळ अपघात ;एक ठार




**माजलगाव । प्रतिनिधी**

मेहकर-पंढरपूर पालखी महामार्गावर ट्रक दुचाकीच्या समोरासमोर झालेल्या धडकेत दुचाकीस्वार चिरडल्याची घटना रविवार (दि.१)रोजी दुपारी अडीच च्या दरम्यान घडली. यात एक जण जागीच ठार झाला आहे.

महारुद्र भीमराव लोंढे रा.खालापुरी ता.शिरूर कासार जि.बीड असे मयत व्यक्तीचे नाव असून, तो तेलगावहून माजलगावकडे दुचाकीवरुन जात असताना अपघात घडला. तर, माजलगावहून तेलगावकडे जाणारा ट्रक (एम एच ४४ ७३७१) आणि दुचाकीची समोरासमोर झाली, ज्यात महारुद्र लोंढे जागीत ठार झाला. पालखी महामार्गावरील रस्त्याच्या मधोमध पडलेल्या भेगा या अपघातात कारणीभूत असल्याचे बोलले जात आहे. टालेवाडी व पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी महामार्ग बनवणार्या गुत्तेदारावर गुन्हा नोंद करा या भूमिकेत प्रेताचा पंचनामा करण्यास पोलिसांना मज्जाव केला. दरम्यान चार वाजेपर्यंत टालेवाडी फाट्यावर

▶▶ उर्वरित पान २ वर

# बेघरांचे आश्रयस्थान- 'जिव्हाळा' ला सिनेकलावंत डॉ. महेशकुमार वनवे यांचा आर्थिक मदतीचा हात

**बीड । प्रतिनिधी**



बेघर-वंचित-असहाय्य-निष्काशित -अशा सर्वच वयोगटातील निराधारांचे निवारा-आश्रयस्थान असलेले,बीड शहरातील भाजी-मंडईस्थित 'जिव्हाळा' या केंद्रात 'वामा-लढाई सन्मानाची' या मराठी चित्रपटाचे प्रमुख कलाकार बीड जिल्ह्याचे सुपुत्र डॉ महेशकुमार वनवे यांनी बालकांना कपडे व सर्वांना गोड-धोड जेवणासाठी आर्थिक मदत संचालक राजू वंजारे यांचेकडे लगेच दिली.

या बाबत अधिक माहिती अशी की,'जिव्हाळा' केंद्राने सिने कलावंत डॉ महेशकुमार वनवे यांचा सत्कार व राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन केले होते. प्रथम राजमातेस निमंत्रितांनी विनम्रपणे अभिवादन केले. काकडहिरा गावच्या आदर्श सरपंच प्रिती बागलाने, छाया सरोदे, माया चव्हाण यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते डॉ संजय तांदळे यांनी प्रमाणपत्र देवुन महेशकुमार वनवे यांचा सन्मान केला. तत्कालीन प्रथेप्रमाणे सती न जाता, अहिल्यादेवीने शौर्य-कर्तबगारी-जबाबदारीने २९ वर्ष लोककल्याण कारी राज्यकारभार केल्याचे,आपल्या मनोगता मधून प्राचार्य डी जी तांदळे यांनी मांडणी केली. से निमुख्याध्यापक मस्के यांनी काव्य गायनाविष्कार सुंदर प्रस्तुत केला. वर्तमान व्यवस्थेत पुष्कळ जन आपल्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक वेदना, दु:ख, दैना झेलत असल्याचे ऐकून-पाहून महेशकुमार भावविवश झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डी जी तांदळे, तर प्रमुख अतिथी सरपंच प्रिती बागलाने,

▶▶ उर्वरित पान २ वर

